कृषी विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर
कृषी विभाग पंचायत समिती भुदरगड
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

1	नवीन विहिर	4,00,000/-
2	जुनी विहीर दुरुस्ती	1,00,000/-
3	शेत तळ्यांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण	प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणा-या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते
4	इनवेल बोअरींग	40,000/-
5	वीज जोडणी आकार	२0,000/-किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते

6	विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन (नवीन बाब)	10 अश्वशक्ती क्षमतेपर्यत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चाच्या ९० % किंवा रू.४०,००० यापैकी जे कमी असेल ते
7	सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी)	प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चाच्या ९० % किंवा रू.५०,००० या यापैकी जे कमी असेल ते
8 .	एचडीपीई/ पीव्हीसी पाईप (नवीन बाब)	प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चाच्या १०० टक्के किंवा रू.५०,००० यापैकी जे कमी असेल ते
9	सूक्ष्म सिंचन संच	
9.1	तुषार सिंचन संच	प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चाच्या ९० % किंवा रू.४७,००० यापैकी जे कमी असेल ते

9.2	ठिबक सिंचन संच	प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चाच्या ९० % किंवा रू.९७,००० यापैकी जे कमी असेल ते
		प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५ % + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25 % + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतुन 10 % तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45 % + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30 % + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतुन 15 % किंवा रू 47,000/- या यांपैकी जे कमी असेल ते
9.3	तुषार सिंचन संच पुरक अनुदान	

		(एकूण 90 % अनूदान मर्यादेत)
9.4	ठिबक सिंचन संच पुरक अनुदान	प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५ % + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25 % + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतुन 10 % तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45 % + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30 % + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतुन 15 % किंवा रू 97,000/- या यांपैकी जे कमी असेल ते (एकूण 90 % अनूदान मर्यादेत)
10	यंत्रसामुग्री (बैलचलित / ट्रॅक्टर चलित	५०,०००/-

	अवजारे) (नवीन बाब)	
11	परसबाग (नवीन बाब)	५,000/-

[redacted]

[redacted]

लाभार्थी पात्रतेच्या अटी

1. लाभार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असणे आवश्यक.
2. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक.
3. शेतकऱ्याचे स्वत:चे नांवे जमिन धारणेचा 7/12 व 8-अ उतारा आवश्यक आहे.
4. लाभार्थ्याकडे आधार कार्ड असणे आवश्यक.
5. लाभार्थ्याचे बँक खाते असणे व ते आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक.
6. दारीद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य.
7. सदर योजनेच्या लाभार्थ्यासाठी लागू असलेली रु.१,५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे.लाभार्थी शेतक-यांकडे किमान 0.40 हेक्टर व कमाल 6.00 हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक असेल.मात्र लाभार्थ्याची जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हे. पेक्षा कमी जमिन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमिन किमान ०.४० हे.इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.
8. एकदा संबधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील ५ वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही.
9. अशाच स्वरुपाच्या कृषि विषयक विकास योजनेकरता विशेष घटक योजनेतुन तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या निधीतून

राबविण्यात येणा-या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

10.सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्याच्या ७/१२ उता-यावर नोंद घेण्यात येईल.

लाभार्थी निवडीची कार्यपध्दती

इच्छूक लाभार्थ्यानी कृषि विभागाच्या महाडिबीटी पोर्टलद्वारे योजनेमध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.लाभार्थ्याची निवड त्या त्या वर्षात उपलब्ध झालेल्या अनुदानाच्या मर्यादेतेच करण्यात येईल.

लाभार्थी:

लाभार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असणे आवश्यक.

फायदे:

वरील प्रमाणे

अर्ज कसा करावा

इच्छूक लाभार्थ्यानी कृषि विभागाच्या महाडिबीटी पोर्टलद्वारे योजनेमध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.लाभार्थ्याची निवड त्या त्या वर्षात उपलब्ध झालेल्या अनुदानाच्या मर्यादेतेच करण्यात येईल.

संपर्क – कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती भुदरगड.

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम

योजनेचे स्वरूप : 100% केंद्र पुरस्कृत

योजनेचा तपशील : पारंपरिक ऊर्जा साधने जसे पेट्रोल, केरोसिन, कोळसा, नैसर्गिक वायू व लाकडी इंधन ही काळाच्या ओघात संपणारी ऊर्जा साधने आहेत. यांच्या वापरावरील भार कमी करण्यासाठी, ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवनमान सुधारण्यासाठी, सर्वसाधारण स्वच्छता तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सन 1982 – 83 पासून शासनाने राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही 100 % केंद्रीय क्षेत्र योजना कार्यान्वित केली आहे.

सदर योजना जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी, कृषी विभाग, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासन दरवर्षी राज्यास बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट ठरवून देते. ठरवून दिलेले उद्दिष्ट राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना वाटप करण्यात येते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन राज्यास 100% निधी 2 ते 3 हप्त्यात उपलब्ध करुन देते.

योजनेचे निकष :

- योजना राबविताना लाभार्थी असलेल्या गावांचा समूह करून योजना राबविण्यात यावी.
- बायोगॅस संयंत्राची मागणी निश्चित करताना लोकांचा सहभाग घ्यावा.
- दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबांची लाभार्थी म्हणून निवड करणे.
- दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबांची संख्या जास्त असल्यास अशा गावांच्या समूहाची निवड करणे.
- ज्या जिल्ह्यात बायोगॅस संयंत्र कार्यान्वित राहण्याचे प्रमाण अधिक आहे व संयंत्रांच्या देखभाल व दुरुस्तीच्या सुविधा उपलब्ध आहेत, अशा भागास अधिक बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट देण्यात यावे.
- उद्दिष्टांचे वाटप करताना स्वयंसेवी संस्था, उद्योजकांकडील प्रशिक्षित गवंड्यांची संख्या विचारात घेऊन बायोगॅस संयंत्र वाटप करावेत.

केंद्र शासनाने बायोगॅस संयंत्र बांधकामाचे नवीन दर निश्चित करुन दिनांक 02 नोव्हेंबर, 2022 रोजी नविन सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदरचे दर सन 2022-23 या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत.

राज्यात बायोगॅसची तंत्रशुद्ध पद्धतीने उभारणी व्हावी म्हणून संयंत्र बांधणाऱ्या गवंड्यांना व ट्रेनर्सना या योजनेखाली प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षित झालेल्या गवंड्यांकडून बायोगॅस संयंत्रे बांधली जातात. बायोगॅस संयंत्राचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात लाभार्थ्यांनासुद्धा प्रशिक्षण देण्यात येते.

अ)	सर्वसाधारण लाभार्थी	1 घ. मी.	रु. 9,800/-
		2 ते 4 घ. मी.	रु. 14,350/-
		5 ते 7 घ. मी.	रु. 22,750/-
	अनुसूचित जाती/जमाती	1 घ. मी.	रु. 17,000/-

		2 ते 4 घ. मी.	रु. 22,000/-
		5 ते 7 घ. मी.	रु. 29,250/-
ब)	i) बायोगॅस संयंत्रास शौचालयास जोडल्यास	1 ते 10 घ. मी.	रु. 1600/-
	ii) MNRE मान्य बायोगॅस स्लरी युनिट	1 ते 25 घ. मी.	रु. 1600/-

क) टनेज फीची (5 वर्षांच्या हमी कालावधीतील देखभाल दुरुस्तीसाठी)

1 ते 10 घ. मी. पर्यंत संयंत्रास रु. 3000/-

15 ते 25 घ. मी. आकारमान असलेल्या संयंत्रांसाठी मात्र टनेज फीची जॉब ऑफ पूर्व-निर्मित/उत्पादित बायोगॅस संयंत्रासाठी पात्र असणार नाही.

बायोगॅस यादी

लाभार्थी:

वर नमूद केल्याप्रमाणे.

फायदे:

वर नमूद केल्याप्रमाणे.

अर्ज कसा करावा

संबंधित विभागाशी संपर्क साधा.